● शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मनपा अतिरिक्त आयुक्त, मालमत्ता विभागाचा सर्वपक्षीय बैठकीचा आव; केवळ कागदोपत्री उठाठेव!

### होर्डिंग्ज-फलकांसाठी एजन्सींना परवानगी; अन् सूचना पक्षीय पदाधिकाऱ्यांना; हा कसला कारभार?

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अनाधिकृत बॅनरबाजीसंदर्भात मनपा प्रशासनाने म्हणण्यापेक्षा अतिरिक्त आयुक्त व मालमत्ता विभागप्रमुखांनी बोलविलेल्या बैठकीचा सारसार विचार केल्यास दुखणं म्हशीला अन् इंजेक्शन पखालीला अशीच काहीशी अवस्था दिसून येते आहे. मुळास सर्वपक्षीय बैठक बोलवल्याचा आव मनपाच्या या दोन अधिकाऱ्यांकडून करण्यात आला असून केवळ मोजक्याच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना निमंत्रण असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात रिकाम्या खुर्च्याच अधिक दिसल्या. होर्डिंग्ज अन् फलकांसाठी काही एजन्सीधारकांना परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्यांना जागा निश्चित करून देण्यात आलेली आहे. काही एजन्सीधारकांना विद्युत खाबांवरील फलकबाजीसाठी मालमत्ता विभागाकडे परवानगी मागितलेली आहे. त्यांना परवानगी दिली की नाही? दिली नसेल तर परवानगी मिळण्यापुर्वीच शहरभरातील विद्युत खाबांवर फलक लावण्यात कसे आले? हे फलक व्यवसायिक तसेच कोचिंग क्लासेसचे आहेत. आणि मुळात याच फलकबाजीमुळे शहर विद्रुपिकरणात भर पडत आहे. असे असतांना या विना परवाना फलक लावणाऱ्या एजन्सी धारकांवर शहर विद्रुपिकरणाचा गुन्हा दाखल करणे आवश्यक असतांना मनपा प्रशानाचे अधिकारी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून सूचना करत आहेत हा निव्वळ दिशाभूल करण्याचा प्रकार म्हणल्यास वावगे ठरणार नाही. केवळ मा. उच्च न्यायालयाच्या याचिका २५५/२०११ च्या अनुषंगाने कारवाई करणे मनपाला आवश्यक असल्याने बैठकीची कागदोपत्री उठाठेव तर केली नाही ना?

मा. उच्च न्यायालयाची जनहित याचिका २५५/२०११ याचिकेच्या अनुषंगाने महानगरपालिकेला दिलेल्या गाईडलाईन्स प्रमाणे शहरातील राजकीय पक्षाचे नेते- पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन बैठक घेऊन त्यांना होर्डिंग्ज् संदर्भातील सुचनांची माहिती देणे ज्यात विना परवाना कोणतेही होर्डिंग्ज किंवा वाढदिवसाचे बॅनर लावण्यात येऊ नये यासाठी शहरातील पक्ष पदाधिकाऱ्यांना बोलावण्यात आल्याची माहिती मालमत्ता विभागाचे राहुल देशमुख यांनी दिली. काँग्रेस, समाजवादी पक्ष, बसपा, एमआयएम यासारख्या राजकीय पक्षांना बैठकील बोलावण्यात आले का? यासंदर्भात श्री देशमुख यांना विचारले असता श्री देशमुख यांनी बघावे लागेल काल पत्र तयार केले होते. बहुतेक सर्वच पक्षांना बोलावण्यात आले असल्याचे मोघम उत्तर दिले. बैठकीला कोणकोण उपस्थित आहे याबद्दलही श्री देशमुख यांना निटसे सांगता आले नाही. व्यवसायिक अथवा कोचिंग क्लासेसचे विद्युत खाबांवर असलेले बॅनर हे काढण्यात येणार असल्याचेही श्री देशमुख यांनी सांगितले असून त्याची सुरुवात ही कन्हैय्यानगर भागातून करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

> शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या फलकबाजांवर 'अंकुश' लावण्याचे काम मनपा प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. दिलेल्या परवानगी पेक्षा अधिकचे फलक - होर्डिंग्ज लावल्या गेले असतील तर अनाधिकृत बॅनर वर कारवाई मनपा प्रशासनाने करावी. ही कारवाई करतांना होर्डिंग्ज्- बॅनर लावणारी एजन्सी, तयार करुन देणारे- प्रिटींग करणारे आदींचा विचार मनपाने करावा. असे न करता केवळ राजकीय पदाधिकाऱ्यांना बोलावून होर्डिंग - वाढदिवसाचे अनाधिकृत फलक न लावण्याच्या सूचना देणे यात कोणते शहाणपण, मुळात हे राजकीय पदाधिकारी कुण्या एजन्सीमार्फतच होर्डिंग्ज लावतात हे मनपाला अद्याप उमजले नसावे?

सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची बैठक असतांना केवळ मोजकेच पदाधिकारी हजर असते. काँग्रेस, समाजवादी पक्ष, बसपा, एमआयएम यासारख्या इतर पक्षाचे पदाधिकाऱ्यांना निमंत्रणच मिळाले नसल्याचे या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले.

पक्षाचे पदाधिकारी हे होर्डिंग, वाढदिवसाचे बॅनर हे एजन्सीमार्फतच लावतात. याचा खुलासाही बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केला. मुळात एजन्सी धारकांना किती होर्डिंग्जसाठी परवानगी देण्यात आलेली आहे. ते किती होर्डिंग्ज लावतात. विद्युत खांबावरील फलकबाजीमुळे शहर विद्रुपिकरण होत आहे. आणि या ठिकाणी जवळपास शंभर टक्के व्यवसायिक तसेच कोचिंग क्लासेसची फलक आहेत. यासाठी मनपा मालमत्ता विभागाने परवानगीच दिलेली नाही तरी देखील हे फलक बिनदिक्कत कसे लागलेले आहेत.



खांबावरील फलबाजीवर कारवाई करतांना मनपा प्रशासनाने हुशारीने कन्हैय्यानगरचा भाग निवडलेला दिसतो, कारण त्या भागातील खांबावर लावण्यात आलेल्या फलकांवर इंग्रजीत 'येथे जाहिरात करा' असे लिहिलेले आढळते म्हणजेच हे फलक काढल्याने एजन्सीधारकांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची परिपूर्ण काळजी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त तसेच मालमत्ता विभागाने घेतलेली दिसते. आता इतर ठिकाणचे फलक काढण्यास मनपाला कधी मुहूर्त भेटतो हे देखिल पहावे लागेल.

एकंदरीत विचार केल्यास केवळ मा. उच्च न्यायालयाचा सन्मानार्थ बैठक बोलवण्याचा प्रताप मनपा प्रशासनाने केलेला दिसून येत आहे. राजकीय पक्षाचे नव्हे एजन्सी धारकांचेच होर्डिंग्ज, फलक असतांना मोजक्या राजकीय पक्षाच्या पदाधिकारी यांना बोलावून अति...रिक्त... आयुक्त व मालमत्ता विभागाने काय सिद्ध केले आहे? होर्डिंग्ज- फलक शहरात लावतयं कोण? बैठकीला बोलावले कुणाला? मनपाच्या अतिरिक्त आयुक्तांना कारभार पाहता येत नाही की, त्यांची दिशाभूल करण्यात येत आहे याचा विचार आता मनपा अतिरिक्त आयुक्तांनीच करावा.

## दहावीचा मराठीचा पेपर फुटला नाही... फुटला!

### प्रशासन द्विधेत !

**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर येथील दहावी पेपर फुटीसंदर्भात जालना जिल्हाधिकाऱ्यांनी आधी चुकीचे वृत्त प्रसारित करण्यात आल्याचे म्हटले. मात्र, काही वेळा नंतर लागलीच चौकशीचे आदेश दिल्याचे माध्यमांना कळविले. त्यामुळे दहावीचा मराठीचा पेपर फुटला नाही, की फुटला अशा द्विधेत प्रशासन दिसून आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेतर्फे घेण्यात येणारी इयत्ता दहावीची परीक्षा दि. २१/०२/२०२५ रोजी सुरू झाली आहे. पहिल्याच दिवशी प्रथम भाषेचे पेपर होते. या पेपरचे वेळी जालना जिल्हयातील जिल्हा परिषद हायस्कूल, बदनापूर ता. बदनापूर येथील परीक्षा केंद्र कमांक ३०५० वर मराठी प्रथम भाषेचा पेपर फुटला असल्याबाबत व यवतमाळ जिल्हयातील महागाव व कोठारी या परीक्षा केंद्रांवर मराठी प्रथम भाषा विषयाची प्रश्नपत्रिका मोबाईलव्दारे व्हायरल झाल्याबाबत, तसेच जिल्हा परिषद प्रशाला, तळणी, ता.मंठा, जि.जालना, केंद्र कमांक ३४३६ या परीक्षा केंद्रासंदर्भात काही वृत्तवाहिन्यांवर बातम्या प्रसारित झाल्यावर जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले. यावर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी काही वृत्त वाहिन्यानी 'जालना जिल्ह्यातील बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला' या आशयाचे चूकीचे वृत्त प्रसारित करण्यात आले असल्याचे म्हटले आहे. परंतू प्रत्यक्षात असा कोणताही प्रकार घडलेला नसुन, स्थानिक झेरॉक्स दूकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली आहे. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही. जिपचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), तहसिलदार आणि पोलिस निरिक्षक यांच्या मार्फत तपासणी करण्यात आली आहे. तथापी याठिकाणी दगडफेक झाली. याबाबत दोषीं व्यक्तीचा शोध घेवून कायदेशीर कार्यवाही सुरु असल्याची माहिती दिली असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

त्यानंतर काही वेळातच जिल्हाधिकारी पांचाळ यांनी दुसऱ्यांदा



व्हिडीओ माध्यमांना दिला. यात त्यांनी गैरप्रकाराची जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व शिक्षण विभाग चौकशी करत असल्याची माहिती दिली. सीएससी काही केंद्राचा उल्लेख करत चौकशी शिक्षणाधिकारी माध्यमिक व पोलीस चौकशी करत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

विभागीय मंडळाच्या सचिव वैशाली जमादार यांनी गैरप्रकाराचे वृत्त खरे आहे की खोटे याबाबत तात्काळ शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क करून अहवाल मागविला असल्याचे सांगितले आहे. शिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल मिळाल्यानंतर जे कोणी या प्रकरणात दोषी असतील त्यांच्यावर बोर्डाच्या नियमावलीनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही वैशाली जमादार यांनी माध्यमांना सांगितले आहे.

एकंदरीत दहावीचा पेपर फुटला नाही... फुटला अशा द्विधेत प्रशासन दिसून आले.

## तरुणांनी छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा

### ह.भ.प. नारायण महाराज पिंपळे गुरुजी यांचे प्रतिपादन



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** श्री संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त व छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन रुपी सेवेमध्ये केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आजच्या तरुणांनी आपल्या आचरणात आणला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे एक आदर्श राज्यकर्ते होते. तत्कालीन परिस्थिती बिकट असून सुद्धा त्या परिस्थितीत आपण एक आदर्श कार्य छत्रपती शिवरायांचे होते. गुलामगिरीच्या राज्यातून एक स्वराज्य निर्माण करण्याचे स्वप्न आपल्या आई-वडिलांनी बघितलं ते स्वप्न पूर्ण करण्याचं काम छत्रपती शिवरायांनी एक मुलगा म्हणून पूर्ण केलं. म्हणूनच एक मुलगा म्हणून आपलं काय कर्तव्य असतं. एक तरुण म्हणून आपल्या इतरांसाठी आपण पान २ वर

## मंठा तालुक्यात दहावी बोर्डाची परीक्षा सुरळीत!

### केंद्राबाहेर गोंधळ घालणाऱ्या १२ जणांवर कारवाई

**मंठा । प्रतिनिधी -** राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या १० वी बोर्ड परिक्षेचा पहिला मराठी पेपर दि २१ रोजी घेतला जात असताना मंठा तालुक्यातील एकुण ८ परिक्षा केंद्र जे की, स्वामी विवेकानंद विद्यालयात मंठा, जिल्हा परिषद प्रशाला मंठा, रेणुका विद्यामंदिर मंठा, छत्रपती संभाजी महाराज विद्यालय हेलस, सिद्धेश्वर विद्यामंदिर ढोकसाळ, लालबहादूर शास्त्री विद्यालय उस्वद, जय भवानी माध्यमिक विद्यालय जयपुर, जिल्हा परिषद प्रशाला तळणी या केंद्रावर एकाच वेळी घेण्यात आलेल्या परीक्षेत २०९२ मराठी माध्यम, ६६ विद्यार्थी उर्दू माध्यम असे एकूण २१५८ विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थी गैरहजर होते. तालुक्यातील सर्वच परीक्षा केंद्रावर परीक्षा कडकडीत व सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी मध्ये घेण्यात आली असून सर्वच परीक्षा केंद्रावर शांततेत भयमुक्त वातावरणामध्ये परीक्षा दिली दहावीच्या पहिल्याच पेपरला मंठा पोलीस प्रशासनाने १२ केंद्राबाहेर गोंधळ घालणाऱ्यांना संशय घेऊन कारवाई केली.

सदर बाजार डिबी पथकाची कारवाई

## एका गुन्हेगाराकडून गावठी कट्टा जिवंत काडतूसासह जप्त तर दुसऱ्याकडून धारदार खंजीर घेतले ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** पोलीस ठाणे सदर बाजारचे डिबी प्रमूख पोउपनि शैलेश म्हस्के पोस्टे ला हजर असतांना त्यांना दिनांक २०/०२/२०२५ रोजी गोपनिय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली को, पूटटी ऊर्फ पृथ्वीराज बबन घाटेकर वय २० वर्ष रा. गुरुगोविंदसिंग नगर जालना हा त्याचे विनाक्रमांकाचे मोटारसायकल वर कमरेला गावठी कटटा (अग्नीशस्त्र) लावून काही तरी गंभीर गुन्हा करण्याचे व दहशत निर्माण करण्याचे उददेशाने जिजामाता प्रवेशद्वार पासून एसआरपीएफ जवळ पाण्याचे टाकीकडे गेला आहे, अशी खात्रीलायक बातमी त्यांनी पोनि संदीप भारती यांना देऊन त्यांचे आदेशाने तसेच मार्गदर्शनाखाली दोन पंच व नमूद पोलीस स्टाफ सह जिजामाता प्रवेशद्वार पासून आत जाऊन एसआरपीएफ पाण्याची टाकी समोरील वनीकरणाचे सहान जागेमध्ये आरोपीचा शोध घेऊन त्यास पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून एक राखाडी रंगाचा लोखंडी धातूचा देशी बनावटीचा गावठी कटटा ज्याचे मूठीला काळ्या रंगाचे प्लास्टीकचे आवरण असलेला, तसेच एक मंग्जीन व पिवळ्या रंगाचा व समोरील बाजूस तांब्याची गोलाई असलेला व पाठीमागील बाजूस KP ७.६५ असे लिहेलेला एक जिवंत काडतुस तसेच एक काळया रंगाची विनाक्रमांकाची हिरो कंपनी स्पेलंडर प्लस मोटारसायकल असा एकूण १,५०,०००/- रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

तसेच पोस्टे सदर बाजार येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार जयेश किशोरसिंग राजपूत रा. बालाजीगल्ली, बालाजीनगर जालना हा दविस कमानीजवळ त्याचे कमरेला एक धारदार पान २ वर

# संपादकीय

पान

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची काल म्हणजे २१ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी होती. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परीस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजाांरांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## टेंभुर्णी येथील ग्राम संसद कार्यालयामध्ये शिवजयंती साजरी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील ग्रामसंसद कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज, यांच्या ३९५व्या जयंती साजरी करण्यात आली ल टेंभुर्णी प्रतिनिधी / टेंभुर्णी ग्रामसंसद कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले व छत्रपती शिवाजी महाराज यांना त्रिवार मानाचा मुजरा करण्यात आला यावेळी ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव शिवाजी मुळे लक्षण शिंदे विष्णु जमधडे सर्जिराव कुमकर बाळु देशमुख गजानन अंधारे भिकन भैय्या पठाण रामकिसन सोनसाळे संतोष पाचे ससाने ग्रामसंसद कर्मचारी विक्रम उकांडे अजिस भैय्या दिगंबर भिसे सुनिल भाले अनिल गायकवाड भिका माने मामा आदींची उपस्थिती होती.





**आनंदी स्वामी महाराजांच्या २२१ वा संजीवनी समाधी पालखी सोहळा निमित्त शुक्रवार (दि २१) सकाळी साडेआठ वाजता आनंदी स्वामी मंदिरातून पालखी मिरवणूक निघाली असून ही पालखी शनी मंदिर, कचेरी रोड, गणपती गल्ली, शास्त्री मोहल्ला, पोलीस चौकी व आनंदी स्वामी मंदिर येथे विसर्जन करण्यात आले (छायाचित्र - किरण खानापुरे)**

## प्राशा डावरगांव देवी येथे मानसिक आरोग्य कार्यशाळा संपन्न

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** ग्रामीण रुग्णालय टेंभुर्णी येथे कार्यरत तालुका समन्वयक जाफराबाद श्री पवन पोपळघट यांनी संवेदना प्रकल्पांतर्गत जि प उच्च प्रा शा ळा डावरगावदेवी येथे विद्यार्थ्यांना मानसिक आजार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले , त्यांनी मानसिक आजाराचे लक्षणे, कारणे, उपचार पद्धती तसेच टोल फ्री नंबर १४४१६ या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले, या धगधगीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती त्याचा आनंद हरवत चालला व आभासी जीवन जगत आहे, नात्या गोत्या पासून विभक्त कुटुंब राहू लागलेत त्या मुळे मनावर याचे वाईट परिणाम होऊ लागले, जास्तीत जास्त सोशल मीडियाचा वापर




या मुळे स्मरण शक्ती कमी, झोपची समस्या निर्माण होणे, तसेच याचे आरोग्यावर सुद्धा वाईट परिणाम होतात, जसे आपण आपले शरीर स्वच्छ ठेवतो तसेच आपले मन सुद्धा निरोगी उत्साही राहावं व या आजारातून बाहेर पडण्यासाठी, व्यायाम, ध्यान धारणा करणे, , सकस आहार घेणे, मैदानी खेळ खेळणे, कृतज्ञता बाळगणे, आपल्याला आवडतील असे कामे, करणे, जेणे करून आपले मानसिक आणि शाररिक स्वास्थ्य चांगलं राहील अशा पद्धतीने तालुका समन्वयक यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या कार्यशाळेस १२९विद्यार्थी व शाळेचे मुखयाध्यापक श्री गोविद जाधव .तसेच शिक्षक तुळशीदास जाधव शिक्षिका श्रीमती रिबीका साने यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पंचायत समितीत होतोय 'पंचायत'

**बदनापूर । प्रतिनिधी -** विविध शासकीय कामांसाठी तालुक्यातुन शेकडो नागरिक पंचायत समिती कार्यालयास भेट देतात. हे कार्यालय शहरापासून दूर असल्याने सर्वसामान्य लोकांना पायपीट करावी लागते. किंवा आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. तालुक्यातील अनेक नागरिक पंचायत समितीला कामानिमित्त भेटी देतात. कार्यालयात गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा कर्मचारी, बांधकाम व आस्थापना कर्मचारी, रोहयोसारख्या महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी नेहमी गैरहजर असतात. पंचायत समितीला गटविकास अधिकारी असून अडचण नसून खोळंबा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ते वाटेत तेव्हा येतात व वाटेत तेव्हा जातात, त्यांच्यावर वचक नसल्याने पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारीही वाटेल तेव्हा दांड्या मारतात. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. रिकाम्या असलेल्या खुर्चा, नाहक सुरुच असलेली विजेची उपकरणे,कार्यालयात पसरलेली स्मशान शांतता व आल्या पावली परतत असलेले नागरीक. अशी परिस्थिती बादनापुर पंचायत समितीत आलेल्या लोकांच्या दृष्टीस पडते. या प्रकारामुळे नागरिकांची मोठी 'पंचायत' होत आहे.

### पान १ वरुन

### तरुणांनी छत्रपती ...

काय कार्य केलं पाहिजे, हीच शिकवण आजच्या तरुण पिढीने छत्रपती शिवरायांकडून घेतली पाहिजे .संस्कार, सुसंस्कृतपणा , छत्रपती शिवरायाकडून शिकण्यासारखा आहे. म्हणूनच छत्रपती शिवरायांचा इतिहास म्हणजे आजच्या तरुण पिढी पुढे एक आदर्श आहे नव्हे नव्हे भविष्यात सुद्धा आदर्श राहील.

श्री संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह जाफराबाद या ठिकाणी कीर्तन महोत्सव सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचे अत्यंत सुंदर नियोजन श्री कोमल महाराज जोशी, श्री जगताप सर, श्री ठाकूर मामा व सर्व आसपासच्या परिसरातील भाविक भक्तांनी केलेल आहे.

या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने ह.भ.प. नारायण महाराज पिंपळे( गुरुजी) यांची कीर्तन सेवा झाली. त्यावेळी त्यांना मृदंगाची साथ करण्याकरता ह.भ. प. विठ्ठल महाराज खेडेकर, गायनाचार्य ह.भ.प. विठ्ठल महाराज भालके ,ह.भ.प. अनिल महाराज देव्हडे, ह.भ. प. किरण महाराज चव्हाण, ह.भ.प. संतोष महाराज चव्हाण, ह.भ.प. भाऊराव महाराज भालके, श्री मालवी सर, श्री धवलिया सर उपस्थित होते.

### एका गुन्हेगाराकडून ...

खंजीर लावून फिरत असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने त्यास दोन पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्याचे कडून एक धारदार खंजीर डीबी पथकाने जप्त केला आहे. असा एकूण १,५०,७००/- रूपयाचा मूद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कामगीरी पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयूष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकों/५९३ रामप्रसाद रंगे, पोहेको /१२६७ जगन्नाथ जाधव, पोहेको/१०७० कावळे, पोना/१३९३ पटेल पोकों/९६३ दुर्गेश गोफणे, पोकों/१५१९ गणेश तेजनकर, पोकों/१६९८ धनंजय लोंढे, पोकॉ/२३० शेख व चालक कल्पेश पाटील यांनी केली.

# स्थलांतरित अवैधरित्या अमेरिकेत गेले हा गुन्हाच, परंतु हातकड्या व बेड्या घालने योग्य का?

अमेरिकेतील भारतीय १८ हजार स्थलांतरितांची आतापर्यंत ओळख पटली आहे.भारतीय स्थलांतरितांना परत आणणारी ही पहिलीच विमानसेवा आहे याबद्दल अमेरिकन प्रशासनाचे स्वागतच.भविष्यात भारतात अशाप्रकारे अनेक विमाने येवू शकतात.त्यामुळे अमेरिकेने हातकड्या आणि बेड्या फक्त अट्टल गुन्हेगारांनाच घालाव्यात.अमेरिकेने पहिल्या बॅचमध्ये १०४, दुसऱ्या बॅचमध्ये ११६ तर तिसऱ्या बॅचमध्ये १५६ स्थलांतरितांना भारतात आणण्यात आले. अमेरिकेने स्थलांतरितांची चौकशी करायला पाहिजे की येणारे स्थलांतरित कोणत्या उद्देशाने अमेरिकेत आलेत.त्यापध्दतीने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करून परत पाठविने योग्य राहील.कारण अमेरिकेच्या या वागण्यावरून लक्षात येते की संपूर्ण स्थलांतरितांना एकाच प्रकारची वागणूक दिली जात आहे ही बाब योग्य नाही असे मला वाटते.अमेरिका सुपर पॉवर असला तरी मनमानी करू शकत नाही. परंतु भारतीय स्थलांतरितांना बेड्या घालून मायदेशी पाठविले जात आहे ही बाब योग्य नाही.जे स्थलांतरित आहे आणि गुन्हेगार आहेत त्यांना अमेरिकन सरकारने अवश्य हातकड्या व बेड्या घालाव्यात याचे स्वागतच केले जाईल.कारण बरेचशे अवैध स्थलांतरित यात गुन्हेगार सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही. परंतु काही स्थलांतरित रोजगार मिळावा या उद्देशाने अवैधरित्या अमेरिकेत गेले ही बाब तेवढीच सत्य आहे. परंतु प्रत्यार्पण करतांना बेड्या घालून गुन्हेगाराची वागणूक देणे ट्रम प्रशासनाचे पाऊल चुकीचे असल्याचे मी समजतो.आता सरकारला विचार करण्याची वेळ आली आहे की भारतातील युवा वर्ग विदेशात अवैधरित्या का जातात याचा सखोल अभ्यास करण्याची हीच योग्य वेळ आहे. स्थलांतरीत विदेशात जातात याचाच अर्थ भारतात युवकांसाठी रोजगाराची योग्य संधी उपलब्ध होत नसावी.अमेरिका भारताचा मित्र आहे असे आपण समजतो.परंतु तसे नाही अमेरिका हा कोणाचाच मित्र नाही किंवा शत्रू नाही.कारण अमेरिका हा व्यापारी राष्ट्र आहे स्वतःच्या स्वार्थासाठी तो काहीही करू शकतो.अफगानिस्तानमध्ये अमेरिकेचे सैन्य २० वर्षे होते परंतु आतंकवाद्यांशी झुंज देवु शकला नाही.शेवटी अफगाण नागरिकांना रक्ताच्या लाथोळ्यात टाकून पळ काढला व अफगाणिस्तानमधील आपले संपूर्ण सैन्य मायदेशी बोलावले. अशाप्रकारेच अनेक देशांना त्यांनी दगा सुध्दा दिला व रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.अमेरिका आणि भारत यांचे संबंध सध्याच्या परिस्थितीत जागतिक पातळीवर प्रथम क्रमांकावर आहे यात शंका नाही.तरीही स्थलांतरितांना बेड्या घालून भारतात पाठविणे योग्य नाही.कारण जे-जे भारतीय अवैधरित्या अमेरिकेत गेले त्यांना परत भारतात पाठवित आहे त्याचे भारताकडून व त्यांच्या कुटुंबीयांकडुन स्वागतच.परंतु एखाद्या कैद्या सारखी वागणूक देऊन हातकड्या व बेड्या घालने योग्य नाही.आपण पाहीले की जे १८ हजार अमेरिकेतील स्थलांतरित आहे त्यांनी लाखो रुपये खर्च करून नौकरीच्या निमित्ताने अवैधरित्या अमेरिकेत प्रवेश केला हे सुद्धा त्यांचे मुर्खपणाचे व बेवकुफीचे लक्षणच म्हणावे लागेल. अमेरिकेत जाण्यापेक्षा हाच पैसा स्थलांतरितांनी भारतात खर्च करून एखादा छोटा-मोठा उद्योग टाकला असता तर त्यांच्या लाखो रुपयात वाढ झाली असती व ताट मानाने जगता आले असते.आज १८ हजार स्थलांतरितांचा पैसाही गेला आणि इज्जतही गेली म्हणजेच तेलही गेले आणि तुपही गेले अशी गंभीर परिस्थिती आज स्थलांतरितांची व त्यांच्या कुटुंबीयांची झाली आहे.त्यामुळे १८ हजार स्थलांतरित आपल्या परिवारासह संपूर्ण कुटुंबाचे गुन्हेगार आहेत. कारण आज्या-बापाने कमविलेला घामाचा पैसा या १८ हजार स्थलांतरित युवकांनी क्षणात मातीमोल केला याचे दुःख त्यांचे कुटुंब कदापि सहन करणार नाही एवढा मोठा जब्बर धक्का परिवारासह कुटुंबाला बसला आहे.त्यामुळे युवकांनो जे आपल्या देशात आहे ते विदेशात कदापि उपलब्ध होणार नाही हेही तितकेच सत्य आहे.भारतातील १८ हजार स्थलांतरित अमेरिकेचे गुन्हेगार आहेच यात दुमत नाही.कारण त्यांनी अवैधरित्या अमेरिकेत प्रवेश केला आहे.परंतु आता



अमेरिकने स्थलांतरितांचे प्रत्यार्पण करतांना सहानुभूती दाखवुन सन्मानाने परत भारतात पाठवावे.कारण असे जर झाले तर संपूर्ण जगात अमेरिकेच्या बाबतीत चांगला संदेश जाईल. सध्याच्या परिस्थितीत जगात रोजगाराच्या बाबतीत भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे कारण जगातील अनेक देशांमध्ये गृहयुद्ध किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून अनेक देशांमधील उद्योग धंदे ठप्प झाले आहेत.याचाच परिणाम म्हणजे अनेक देशांनी स्थलांतरितांना मायदेशी पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे जे काही करायचे आहे ते विदेशात न करता आपल्याच भुमित केले तर देशाला, परिवाराला व कुटुंबाला याचा भरपूर फायदा होईल व सर्वत्र आल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येईल.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# समाजातील एकोपा टिकवण्याचे काम मंदिरांनी केले - आमदार लोणीकर

## किर्तापुर येथे डांबरी व सिमेंट कॉँक्रीट रस्ता व पुलाचे लोणीकरांच्या हस्ते लोकार्पण

**मंठा । प्रतिनिधी -** समृद्ध आणि वैविध्यपूर्ण इतिहास असलेला भारत एकेकाळी आध्यात्मिक आणि भौतिकदृष्ट्या समृद्धीचे प्रतीक होता. काळाच्या ओघात भारतातील मंदिरांच्या बहुआयामी भूमिकेचा शोध घेतला गेला आणि केवळ धार्मिक संस्था असण्यापलीकडे त्यांचे महत्त्व असल्याचे स्पष्ट झाले. मंदिरे केवळ उपासनेची केंद्रे नाहीत तर राष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय परिदृश्याला आकार देणारे महत्त्वाचे घटक देखील आहेत. मंदिरे ही प्रार्थनास्थळे म्हणून काम करत होती आणि आहेत परंतु त्यापेक्षा जास्त आध्यात्मिक विकासाला चालना देतात. मंदिरे ही शिक्षणाची केंद्रे होती, साधक आणि विद्वान दोघांनाही आध्यात्मिक शिक्षण देत असत. धर्मग्रंथांचा अभ्यास केला जात असे आणि तात्विक चर्चा भरभराटीला येत असत, ज्यामुळे समाजाच्या बौद्धिक समृद्धतेत भर पडत होती, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

मंठा तालुक्यातील किर्तापुर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहण कार्यक्रम तसेच ३ कोटी रुपयांचा डांबरी व सिमेंट कॉँक्रिटीकरण रस्ता व २ कोटी रुपयांच्या मलाच्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी आमदार लोणीकर बोलत होते. पूढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, भजन आणि कीर्तनाच्या स्वरूपात भक्ती संगीत मंदिराच्या परिसरातून प्रतिध्वनीत झाले. या सांस्कृतिक अभिव्यक्तींनी केवळ आध्यात्मिक अनुभव अधिकच गहन केला नाही तर सामुदायिक बंधनातही भूमिका बजावली. मंदिरे सामुदायिक मेळाव्यांसाठी केंद्रबिंदू म्हणून काम करत असत, एकता आणि सामायिक ओळखीची भावना वाढवत असत. सण आणि कार्यक्रम सामाजिक सीमा ओलांडून लोकांना एकत्र आणतात. अनेक मंदिरांनी शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये चालवली, ज्यामुळे समाजाच्या कल्याणात हातभार लागला. शिक्षण केवळ आध्यात्मिकच नव्हते तर त्यात इतर विविध क्षेत्रांचाही समावेश होता. मंदिरांमध्ये होणाऱ्या उत्सवांमुळे समुदायांमध्ये आनंद आणि उत्साह निर्माण झाला. त्यामुळे सामाजिक बंधने मजबूत झाली आणि लोकांना एकत्र येऊन उत्सव साजरा करण्याची संधी मिळाली. असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

जुन्या काळातील मंदिरे ही आर्थिक केंद्रे होती आणि आजही आहेत, ती यात्रेकरू आणि व्यापाऱ्यांना आकर्षित करत होती. लोकांच्या गर्दीमुळे स्थानिक बाजारपेठांची वाढ झाली आणि आजूबाजूच्या परिसरांचा विकास झाला. कारागीर आणि कारागिरांना मंदिरांमध्ये संरक्षण मिळाले, त्यांनी उत्कृष्ट शिल्पे, चित्रे आणि हस्तकला तयार केल्या. यामुळे पारंपारिक कलांचे जतनच झाले नाही तर आर्थिक समृद्धीलाही हातभार लागला. बहुतेकदा धोरणात्मकदृष्ट्या स्थित असलेली मंदिरे व्यापार आणि वाणिज्य केंद्रे बनली. त्यांनी आर्थिक व्यवहार सुलभ केले आणि प्रदेशांच्या समृद्धीला हातभार लावला. अनेक मंदिरांकडे शेतीसह मोठ्या जमिनी होत्या. त्यातून मिळणारे उत्पन्न मंदिराच्या व परिसरातील अत्यावश्यक बाबींच्या आर्थिक कल्याणाला चालना देत असे. मंदिरांच्या बांधकाम आणि देखभालीमुळे कुशल आणि अकुशल कामगारांच्या विस्तृत श्रेणीसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. आध्यात्मिक पर्यटनामुळे निवास, भोजन आणि धार्मिक भेटवस्तूंवर पैसे खर्च करणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करून आर्थिक विकास होतो, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थांना चालना मिळते. यामुळे पर्यटनाशी संबंधित क्षेत्रात नोकरीच्या संधी निर्माण होतात आणि विविध समुदायांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण आणि समजूतदारपणा वाढतो, ज्यामुळे शाश्वत विकासाला हातभार लागतो. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून किर्तापूर येथे ३ कोटी रुपयांचा डांबरीकरण व सिमेंट कॉँक्रीट रस्त्याचे तर २ कोटी रुपयांच्या पुलाचे लोकार्पण देखील लोणीकरांच्या हस्त करण्यात आले. स्वातंत्र्याचा ७० वर्षानंतर देखील गावासाठी डांबरीकरण रस्ता नव्हता तो आमदार बबनराव लोणीकर यच्या माध्यमातून मिळाला त्याचप्रमाणे गावाजवळच्या नदीवर मोठा पूल मागील अनेक दिवसांपासून मागणी असताना पूर्ण होऊ शकला नाही ती मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी ६ महिन्यात पूर्ण केले अशी भावना यावेळी गावकऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी हभप बबन महाराज हंडीकर, भाजपा तालुकाध्यक्ष सतीश राव निर्वळ विठ्ठलराव काळे कैलास बोराडे पांडुरंग काळे सरपंच भागवत पोटे उपसरपंच विजयी घारे सरपंच बाबाजी जाधव खुशाल इगारे कैलास पोटे देविदास पोटे माणिक पवार सदाशिव विघारे अरुण अवांके मारुती घारे अशोक आप्पा सोनटक्के कानोबा थोरात रामकिसन केंद्रे अंबादास पोटे भास्कर आप्पा सोनटक्के किसनराव पवार राहुल काळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# किराणा व्यापाऱ्यांसाठी मोठा दिलासा; मार्केट यार्डात पोलीस चौकी उभारणार!

## डीवायएसपी कुलकर्णी यांची किराणा व्यापाऱ्यांशी महत्वपूर्ण बैठक



**जालना । प्रतिनिधी -** लग्नसराईच्या हंगामात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असल्याने, किराणा व्यापाऱ्यांना लुटमारीच्या घटनांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत २० फेब्रुवारी रोजी नवीन मोंढा येथील किराणा मार्केटमध्ये व्यापाऱ्यांसोबत महत्वपूर्ण बैठक पार पडली.

कपल ट्रेडर्स येथे आयोजित या बैठकीत चंदनझीरा ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंदे व जाधव यांची उपस्थिती होती.

गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत असल्याचे सांगून या दृष्टीने अनंत कुलकर्णी म्हणाले की, सकाळ ते संध्याकाळपर्यंत साध्या वेशातील पोलीस गस्त वाढवली जाणार असून, मार्केट यार्डच्या प्रवेशद्वारावर पोलीस चौकी उभारण्यात येत आहे. चौफुलीवर गतिरोधक व सिग्नल बसवण्यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा सुरू असून, चंदनझीरा, सदर बाजार, व तालुका पोलीस ठाण्यांचा संयुक्त वॉच राहील. मध्यंतरीच्या एक-दोन लुटमारीच्या घटनांची उकल करून आरोपींना लवकरच अटक करून व्यापाऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण केली जाईल असे अनंत कुलकर्णी म्हणाले.

जालना होलसेल किराणा असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पंच यांनी व्यापाऱ्यांच्या समस्या मांडत, पोलीस चौकी व गस्त वाढवल्यास लुटमारीच्या घटनांना लगाम बसेल, असा विश्वास व्यक्त केला. पोलिसांनी घेतलेल्या त्वरित निर्णयांबद्दल त्यांनी अनंत कुलकर्णी आणि संपूर्ण पोलीस दलाचे आभार मानले.

या बैठकीला पुरुषोत्तम अग्रवाल, कपिल चावला, सुनील रुणवाल, अनिल पंच, संजय लव्हाडे, वसीम भाई यांच्यासह किराणा व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती पावले उचलली जात असून, पोलिसांच्या सतर्कतेमुळे लुटमारीच्या घटनांना आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अंबड बस आपघातात दोन प्रवाशी ठार, तर चार जण गंभीर जखमी

**जालना । प्रतिनिधी -** ब्रेक न लागल्यानं बस थेट अंबड बस स्थानकात घुसल्याची घटना घडलीय.या घटनेत दोन प्रवाशी ठार झाले असून ४ प्रवाशी जखमी झाले आहेत.या घटनेतील जखमींना जालन्यातील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलंय. याविषयी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक रामेश्वर गाडेकर यांच्याशी संपर्क साधला असता आज दि. २१ शुक्रवार रोजी दुपारी साडेचार वा. च्या सुमारास त्यांनी माहिती दिली की,या



अपघातामध्ये मुरलीधर आनंदा काळे, वय ६० वर्ष,रा.शेवगा, खलील उल्ला अजीम उला शेख वय ७५ वर्ष रा. बुर्हान नगर, जालना अशी दोन्ही मयताची नाव आहेत. तर पारूबाई नवघरे, वय ४० वर्ष या जखमी असून त्यांच्या छातीमध्ये फक्चर झाल्याने त्यांना नातेवाईकांनी औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात हलवले आहे. हिना अलीम शेख वय २६ वर्षे यांच्यावर जालन्यातील घाटीत उपचार सुरु आहेत.रिहान शेख आणि आयान शेख जुळी मुले दीड ते दोन वर्षाची असून त्यांना नातेवाईकांनी जालना शहरातील खासगी बाल रुग्णालया मध्ये ऊपचारासाठी हलविले असून जखमी हिना अलीम शेख यांची ही मुले असल्याचे डा. गाडेकर यांनी माहिती दिली.

# छत्रपती शिवाजी महाराज प्रतापी महापुरुष - प्रा.डॉ.मदन मगरे

**जाफराबाद । प्रतिनिधी -** दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.मदन मगरे हे होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा.डॉ.मदन मगरे यांनी उपस्थितितांना संबोधित करताना आपल्या व्याख्यानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर सखोल प्रकाश टाकताना छत्रपती शिवाजी महाराजांना बालपणीचे माता जिजाऊंचे योग्य संस्कार मिळाले. त्यांना शस्त्र हाताळणी, खेळ, सवंगडी गोळा करणे यातच त्यांना युद्धनीतीचे धडे दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी कुशल अष्टप्रधान मंडळ स्थापन करून शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले ज्यामध्ये शेतकऱ्याच्या बांधावरील लाकूड देखील तोडताना तेही जीर्ण झालेले असेल तरीदेखील शेतकऱ्या सोबत विचार विनिमय करून त्यांना विश्वासात घेऊन योग्य मोबदला देऊन मगच त्या वृक्षाची तोडणी करावी यातूनच महाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय आपल्याला येतो. स्त्रियांचा सन्मान राखणे हा सर्वात मोठा हेतू महाराजांच्या कार्यकाळात दिसून येतो अठरापगड जातीच्या मावळ्यांना एकत्र करून महाराजांनी आपली सेना उभारली कमी सैन्याच्या बळावर देखील कुठलाही मुहूर्त न पाहता अमावस्येच्या रात्री देखील महाराजांनी परकीयांवर आक्रमण करून विजय प्राप्त केला यातूनच अंधश्रद्धेला महाराजांनी त्याच काळात मूठ माती दिली. अशा अनेक उदाहरणातून त्यांनी उपस्थित त्यांना सखोल मार्गदर्शन केले.




अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉक्टर रमेश देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप करताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल जगातील अनेक विद्वानांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आपापल्या परीने गौरवोद्गार काढल्याचे दिसून येते यांची वेगवेगळी उदाहरणे ही प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी दिली. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे असून त्यांनी स्वतः कधीच आपल्याला राजा संबोधले नाही. रयतही महाराजांच्या काळात अतोनात सुखी होती. त्यांना कुठली भीती नव्हती. त्याचबरोबर प्राचार्य देशमुख यांनी या भूमीमध्ये दोन क्रांतीसुर्य जन्माला आले. एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज व दुसरे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. यावरून आपण किती भाग्यवान आहोत! असे उपस्थितांना संबोधित केले. व जाता जाता त्यांनी केवळ या महात्म्यांना त्यांच्या जयंती पुण्यतिथी दिनानिमित्त नव्हे तर त्यांच्या कार्याची आठवण दररोज प्रत्येकाने ठेवावी व तसे आचरण करावे असा संदेशही दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर मोठा भाऊ मोरे यांनी केले तर आभार प्राध्यापक बाळकृष्ण बाविस्कर यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिवजयंतीनिमित्त विश्वनिर्माता फाऊंडेशनतर्फे पाणी वाटप उपक्रम



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विश्वनिर्माता फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मंमादेवी चौक, संविधान चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर आणि सत्कार कॉम्प्लेक्स येथे पाणी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला.

शिवजयंतीच्या दिवशी उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना आणि शिवप्रेमींना थंड पाण्याचे वाटप करण्यात आले. तसेच, या कार्यक्रमाद्वारे शिवाजी महाराजांच्या विचारांचे स्मरण करीत त्यांची शिकवण आजच्या पिढीने आत्मसात करावी, असा संदेशही देण्यात आला.

या वेळी विश्वनिर्माता फाऊंडेशनचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी सर्व नागरिकांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या आणि पाणी वाटप उपक्रमात सहभाग घेतला.

शहरातील विविध भागांत शिवजयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. ठिकठिकाणी शिवरायांच्या मिरवणुका, अभिवादन सोहळे, लेझीम पथकांचे सादरीकरण आणि भव्य भगवे ध्वज परिक्रमा आयोजित करण्यात आली होती. तरुणांनी भगवे फेटे घालून, पारंपरिक वेशभूषेत ढोल-ताशांच्या गजरात उत्सव साजरा केला.

शहरातील सर्व शिवभक्तांसाठी हा दिवस अभिमानाचा ठरला. अनेक संघटनांनी विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. त्यामध्ये रक्तदान शिबिर, अन्नदान, ग्रंथदान आणि स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या.

शहरात सर्वत्र जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. नागरिकांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत, त्यांचे विचार पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. या निमित्ताने शिवजयंती उत्सव केवळ आनंदाचा नव्हे, तर समाजसेवेचा व लोककल्याणाचा संदेश देणारा ठरला.

# मंगरूळ येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील मंगरूळ येथे शिवराजे मित्र मंडळ यांच्या वतीने शिवजयंती उत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमजद सेठ पठाण होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने छोटे छोटे चिमुकल्या मुलांनी आपले भाषण कौशल्य नृत्य स्पर्धाही आयोजित केल्या होत्या त्यामध्ये छोट्या मुलांनी आपले छानसे कौशल्य त्या ठिकाणी दाखविले असून मंगरूळ येथे छत्रपती फुले शाहू आंबेडकर विचारांचा वारसा जपणारी ही शिवजयंती सर्व जाती धर्मांच्या लोकांनी मोठ्याने हिरहिरीने साजरी केली. यावेळी अध्यक्ष स्थानि असलेले अमजद सेठ पठाण यांनी बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वसामान्य रयतेला आपलं राज्य कसं वाटेल यासाठी काम केलं. शेतकरी सुखी तर रयत सुखी रयत सुखी तर राजा सुखी असे हे लोक कल्याणकारी राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर ची निष्ठा स्वराज्यातील मावळ्यांची कायम होती. या कार्यक्रमांमध्ये उपस्थित पोलीस पाटील देविदास गवते, ज्ञानेश्वर पाटील शिंदे, कृष्णा पवार, नितीन पाटील शिवणकर, श्रीहरी डोके, प्रल्हाद डोके, केशव गवते, शेषराव डोके, भाऊसाहेब गवते फारूक शेठ , तंटामुक्ती अध्यक्ष शेख सलीम, पंडित बोर्डे, ज्ञानेश्वर गवते, शिवाजी गवते, सुधाकर पिंपळे, विष्णू डोके, दादाराव डोके, शेषराव डोके, समाधान गवते, पद्माकर महाराज पिंपळे, पुरुषोत्तम शिंदे, गणेशनाथ धारकर, गोरखनाथ धारकर, चेतन शिंदे, नंदकिशोर शिवणकर, करण डोके, ऋषिकेश पवार, विकास वाघ ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील औरंगाबाद चौफुली परिसरातील इंडियन जर्नलिस्ट असोसिशनच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीमध्ये जालना जिल्हा कार्यकारीणी प्रमुख अध्यक्ष सिराज अहमद कुरेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत तर महाराष्ट्र उपाध्यक्ष जावेद खान यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत संघटनेचे जिल्हाध्यक्ष आमेर खान यांना इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन जालना जिल्ह्याची उर्वरीत कार्यकारीणी जाहिर केली असुन यात प्रामुख्याने विंग महिला जिल्हाध्यक्षपदी पत्रकार निकीता काळे यांची तर संघटनेच्या जिल्हा कोषाध्यक्षपदी चेतन पाटील यांची निवड केली आहे.

संघटनेच्या कार्यालयात आज दि.२१ फेब्रुवारी रोजी महत्वपुर्ण बैठकीचे आयोजन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सिराज अहमद कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली तथा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जावेद खान यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते, यात प्रामुख्याने संघटनेचे असलेल्या वैशिष्टपुर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली, यावेळी जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी जालना जिल्हा संघटनेची उर्वरीत कार्यकारीणी जाहिर करून संघटनेचे अध्यक्ष सिराज अहमद कुरेशी आणि महाराष्ट्र उपाध्यक्ष जावेद कुरेशी यांच्याहस्ते नियुक्ती पत्र देऊन पदाधिकार्यांची नियुक्ती केली यात प्रामुख्याने संघटनेच्या विंग महिला जिल्हाध्यक्षपदी निकीता काळे यांची तर कोषाध्यक्षपदी चेतन पाटील यांच्यासह जिल्हा संरक्षण सुनील नरोडे, वरिष्ठ उपाध्यक्ष शेख मुजीबुद्दीन, उपाध्यक्ष सुनील भारती, जिल्हा महासचिव राहुल मुळे, जिल्हा प्रवक्ता मजहर सौदागर, जिल्हा सचिव शेख सलीम व रईस शेख, जिल्हा संघटन सचिव तरंग कांबळे, जिल्हा मीडिया प्रभारी गणेश सातपुते, यांची निवड केली, यावेळी मार्गदर्शन करतांना सिराज कुरेशी यांनी सांगितले की, संघटनेचे काम अतिशय निर्मळ आणि पत्रकारितेसाठी योग्य प्रमाणात करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत तसेच जावेद खान बोलतांना महणाले की, पत्रकारांच्या विविध समस्यां सोडविण्यसाठी संघटना कायम अग्रेसर असुन राज्यात संघटनेचे जाळे मोठ्या प्रमाणात विणण्यात येणार आहे, तसेच जिल्ह्यातील प्रत्येत शहरासह तालुक्यात संघटना वाढीसाठी आपण कायम प्रयत्नशील असल्याचे जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी बोलतांना सांगितले. यावेळी नवनियुक्त पदाधिकार्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

### राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमाचे आमदार लोणीकर यांच्या हस्ते उद्घाटन

# कष्टाची तयारी, दुर्दम्य उत्साह आणि सकारात्मक वृत्तीशिवाय उद्योजक घडत नाहीत - आमदार लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या युगामध्ये अनेक जण नोकरीच्या मागे धावत असून नोकरी हेच आजच्या अनेक तरुणांचे अंतिम ध्येय बनले आहे. नोकरी हे अंतिम ध्येय न ठेवता आपण उद्योजक बनले पाहिजे. लघु, सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म व्यावसायिकांसाठी सरकारी योजना, बँक कर्जसुविधा यांची मुबलक उपलब्धता आहे. पुण्यासारख्या शहरात हे व्यावसायिक या सोयी-सवलतींबद्दल जागृत आहेत. परंतु ते या सुविधांचा लाभ घेण्यासाठी उत्सुक नसतात. त्यामुळे नव तरुणांनी नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक बनावे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना येथे एका हॉटेलमध्ये संपन्न झालेल्या एम.एस.एम.ई. व भीम उद्योग अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना आ.लोणीकर पुढे म्हणाले की, कोणताही उद्योग व्यवसाय उभारायचा म्हटला की तीव्र इच्छाशक्ती असावी लागते पण फक्त तीव्र इच्छा असून चालत नाही. तुम्ही राबवत असलेल्या संकल्पनेला बाजारपेठही असावी लागते, आणि ही बाजारपेठ सातत्याने वाढती असावी लागते. या बाजारपेठेला काबीज करण्यासाठी शिस्त,



सातत्य, चिकाटी आणि उत्तम व्यवस्थापन असावे लागते. प्रत्येकाला आपला उद्योग मोठा व्हावा असे वाटत असते. पण तो मोठा करण्यासाठी नेमके काय करावे याची जाणीव नसते त्यामुळे प्रयोग करण्यातच खूप वेळ जातो. जगातील मोठ्या उद्योगांचा अभ्यास केला तर लक्षात येईल की या उद्योगांनी आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यशस्वी उद्योजक होण्यासाठी त्याकरिता लागणारी सर्जनशीलता उद्योजकाकडे असावी लागते. पुरेसे भांडवल अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणि कुशल मनुष्यबळ यांच्या जोरावर उत्पादकता वाढ साधायला हवी. व्यवसायसंस्थेतील कामांचा क्रम व वेळापत्रक ठरवून, वेळेचं सुयोग्य व्यवस्थापन करावे लागते. सर्वात महत्वाचे म्हणजे बाजारपेठेचा अभ्यास करून, संभाव्य विक्रीचा अंदाज बांधून आणि विपणन संशोधन करून, प्रभावी मार्केटिंग करावे लागते. ग्राहकांचे मानस शास्त्र समजावून घेऊन, परिणाम कारक जाहिरात व विक्रय वृद्धी योजना राबवाव्या लागतात. आजुबाजूच्या पर्यावरणात घडणारे बदल लक्षात घेऊन सतत अचूक आणि वेळेत निर्णय घ्यावे लागतात. संवाद कौशल्य आणि वाटाघाटींचे कौशल्य आत्मसात करावे लागते. आणि सर्वात शेवटी प्रचंड कष्टाची तयारी, दुर्दम्य उत्साह आणि प्रखर सकारात्मक वृत्ती असावी लागते. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

नवीन उद्योजक निर्माण होण्यासाठी त्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे गरजेचे असून आर्थिक तरतूद नसल्यामुळे अनेक उद्योजक उद्योगाची उभारणी करू शकत नाहीत बँकेचे पाठबळ असणे अत्यंत आवश्यक आहे अशावेळी शासन स्तरावर मोठे प्रयत्न होणे गरजेचे असून भीम उद्योग अभियान मार्फत ज्या उद्योजकांना नवीन उद्योगाचे विचार आणि करण्यासाठी प्रयत्न केले जातील त्या सर्व उद्योजकांच्या पाठीशी आपण काम करून उभे राहणार असून शासन स्तरावर त्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी कायम असा शब्द यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला.

यावेळी भीम उद्योग अभियानाचे अध्यक्ष संजय भालेराव, राजेश राऊत, एम.एस.एम.ई. चे राहुल मिश्रा, नरेंद्र इस्टोलकर, मिलिंद काळे, मनोजकुमार शर्मा, शहादेव सातपुते, संतोष काळे, प्रकाश इनकर यांच्यासह अनेक नव उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुख हे कायमस्वरुपी असायला हवे-हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर

### कॉलनीतून निघालेल्या दिंडीने लोकांना आकर्षित केले तर काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

**जालना । प्रतिनिधी -** आज प्रत्येक जण सुखाच्या शोधात आहे पण सुख कोठे आहे? सुख हे आपल्याला कायमस्वरुपी असावे, असे वाटत असेल तर परमार्थाकडे वळावे लागेल, असा हितोपदेश हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांनी येथे बोलतांना दिला.

हभप डॉ. आनंदगडकर हे सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात आयोजित केलेल्या काल्याच्या किर्तनात बोलत होते. आपल्या कीर्तनाच्या प्रारंभीच त्यांनी गजनान महाराज संस्थानचे अध्यक्ष स्व. शिवाजीराव आर्दड यांना श्रध्दाजली अर्पण करुन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. पुढे बोलतांना हभप डॉ. आनंदगडकर म्हणाले की, सुखासाठी आज रोजी प्रत्येक जण झटतांना दिसतो आहे पण सुख कोठे आहे? भरपूर पैसा, गाडी, बंगला असला म्हणजे सुख आहे असे थोडेच आहे. आपल्याला कायमस्वरुपी सुख असावे असे वाटत असेल तर पर्थाकडे वळावे लागेल, असेही ते म्हणाले. लग्नच नसेल तर काय करायचे त्या पैशाचे, गाडीचे आणि बंगल्याचे? लग्न झाले तरी मुलांसाठी जिव झुरतोच ना, असे सांगून हभप डॉ. आनंदगडकर यांनी श्रीकृष्ण लिलांबरोबरच कंस आणि भारतीय संस्कृतीचे महत्वही विषद केले. तत्पूर्वी सकाळीच सहकार बँक कॉलनी आणि परिसरातून निघालेल्या दिंडीने लोकांचे आकर्षित करुन घेतले. लक्ष्म्यांनी आपल्या घरापुढे सडा, रांगोळ्या काढल्या होत्या. त्यामुळे दिंडीत सहभागी झालेल्या वारकर्यांनाही थोडावेळ का होईना हायसे वाटले. गेल्या आठ दिवसापासून सुरु असलेल्या सप्ताहाची सांगता आज शुक्रवारी हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. त्यानंतर उपस्थित सर्वांना महाप्रसाद देण्यात आला. या सप्ताहाच्या यशतेसाठी संस्थानचे सचिव संपतराव पाटील व विश्वस्त मंडळाबरोबरच शिरीष सांगोळे, तुकाराम मुंडे, रवि मुंडे, आत्माराम बिडवे आदींनी परिश्रम घेतले.



युवा आदर्श

**जनमन ...**

कार्य कर्ता यशस्वी  
जाणावे रे जनमना  
नस खरी ओळखा  
पुरी हो मन कामना  
कदर करे लोकांची  
तो योग्य सिंहासना  
आदर करे इच्छांची  
सन्मान देई आसना  
जनसेवा रे ईशसेवा  
असो हीचं वासना  
जनकल्याण हीच रे  
मानासार्थ उपासना  
महापुरुष हे आदर्श  
दुखवू नका भावना  
स्वत्वाचा उपमर्द रे  
उद्रेकाची संभावना  
इतिहासा प्रति अति  
जागृत असे संवेदना  
अस्मितेला हो हानी  
अतीव होतात वेदना  
बाहय शत्रू तद्नंतर  
करे अंतस्थ सामना  
तिरंगा प्रतिष्ठा जपा  
रक्त उसळले धमना  
खुर्चीचा हव्यास पुरे  
नको सत्तेची अशना  
लोकसेवा स्वर्णसंधी  
जाण रे पूजा अर्चना

**हेमंत मुसरीफ पुणे**  
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.